वर्ष-०८ | अंक-४६ | मुंबई, मंगळवार ०४ ते १० ऑक्टोबर - २०२२ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
PG 2
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

मंकीपॉक्स मुळे उद्भवतात मानसिक समस्याच

3 → राज्य सरकारचं गिफ्ट; इटउ,बेस्टचे कर्मचारी, शिक्षक यांच्यासह आरोग्य सेविकांना दिवाळी बोनस जाहीर
आता आमच्यात नातं उरलेलं नाही; ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## मोटार सायकल चोरी करणा-या आरोपीस अटक करुन 4 गुन्ह्यांची उकल

### –नालासोपारा पोलीस ढाणे यांची कामगिरी



नालासोपारा : मोटार सायकल चोरी करणा-या आरोपीस नालासोपारा पोलिसांनी अटक करून मुद्देमाल केला जप्त . अधिक माहितीनुसार दि २१/०९/२०२२ रोजी रात्री ०८.३० वा.दरम्यान विनोद वासुदेव नाईक, रा. आलोक निवास, नालासोपारा (पश्चिम) यांनी त्यांची हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल ही त्यांच्या घराच्या अंगणात पार्क करुन ठेवलेली असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांची मोटारसायकल चोरी केल्याने त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नालासोपारा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नालासोपारा इथे मोटारसायकल चोरी होण्याचे प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सदर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हे उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्ह्याचा तपास सुरु केला. तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी महेश लनु दादोडे, रा. वसईफाटा यास दिनांक २९/०९/२०२२ रोजी नमूद गुन्हयात पोलिसांनी अटक केली असून आरोपीची सखोल चौकशी केली असता त्याने नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये तसेच तुळींज पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात ४ मोटारसायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याकडून चोरीस गेलेल्या ४ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या असून एकूण ४ गुन्हयांची उकल करण्यात पोलिसानं यश आले.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाधुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ , श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पो.आयुक्त नालासोपारा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विलास सुपे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक नालासोपारा पोलीस ठाणे, श्री. राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.हवा. किशोर धनु, पो.ना. सचिन कांबळे, अमोल तटकरे, पो.शि. कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर यांनी केलेली आहे.

## कोपरगावात महिलेची दगडाने ठेचून हत्या, आरोपीने मृतदेहाशेजारी झोपून रात्र घालवली



भंगार गोळा करण्याच्या वादातून एका परप्रांतियाने भिक्षेकरी महिलेची दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना कोपरगावमध्ये घडली आहे. विशेष म्हणजे आरोपी रात्री मृतदेहाशेजारी झोपून होता. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून सकाळी रेल्वेने फरार होण्याच्या तयारीत असणाऱ्या आरोपीला पोलिसांनी मोठ्या शिताफीने जेरबंद केलं आहे. अहमदनगर जिल्ह्यात कोपरगाव तालुक्यातील शिंगणापूर शिवारात भिक्षेकरी महिला मयत सोनू कुमारी आणि मूळचा बिहार येथील असणारा आरोपी निसार खान यांचे भंगार आणि प्लास्टिक बाटल्या गोळा करण्यावरून वाद झाला होते. त्याचाच राग मनात धरून निसार खान याने रात्रीच्या सुमारास सोनू कुमारीची दगडाने ठेचून हत्या केली. त्यानंतर निसारनं सोनू कुमारीचा मृतदेह एका व्यापारी संकुलातील दुकानासमोर ओढत नेला आणि आरोपी बराच वेळ मृतदेहाशेजारी झोपून राहिला. जाग आल्यानंतर आरोपी तेथून फरार झाला. दरम्यान सकाळी दुकानाचा मालक दुकान उघडण्यासाठी आला असता त्याने मृतदेह पाहिला आणि तातडीने पोलिसांना माहिती दिली. आरोपीचे कृत्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे त्याचा शोध सुरू केला. पोलिसांनी काही तासातच केलं मोठ्या शिताफीने आरोपीला जेरबंद आरोपी निसार खान रेल्वेने दुसरीकडे पळून जाण्याच्या प्रयत्नात असतानाच पोलिसांनी काही तासातच मोठ्या शिताफीने त्याला जेरबंद केले. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्यावर कलम 302 प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने यापूर्वीही असे काही कृत्य केले आहेत का? याचा तपास आता पोलीस करत आहेत. कोपरगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक वासुदेव देसले यांनी सांगितलं की, आम्ही तातडीने पथक तयार केलं आणि त्यांनी चौकशी सुरु केली. घटना समोर आल्यानंतर आम्ही रेल्वे स्थानक परिसर आणि संबंधित परिसराची तपासणी केली आणि आरोपीला ताब्यात घेतलं. गुन्ह्यानंतर तातडीनं कार्यवाही केल्यामुळं आरोपी सापडू शकला. यातील आरोपी आणि मृताचा दोघांचाही कुठलाही पत्ता नाही. त्यामुळं आरोपी जर आता पळून गेला असता तर कदाचित तो सापडू शकला नसता. आता आरोपीला पकडून त्याला पोलिस कस्टडी घेतली आहे.

## करारनामा एकासोबत तर विक्रीपत्र दुसऱ्यासोबत, नागपुरात निवृत्त न्यायाधीशांचीच फसवणूक; बिल्डरविरोधात गुन्हा दाखल




नागपूरः सामान्यांची फसवणूक झाल्यास त्यांना पोलिसांकडे धाव घ्यावी लागते. फसवणूक करणाऱ्याला शिक्षा व्हावी म्हणून कोर्टात दाद मागावी लागते. मात्र नागपुरातील एका बिल्डरकडून चक्क निवृत्त न्यायाधीशाची फसवणूक करण्यात आली आहे. भामटी येथील रेंगेनगर येथे सुरु केलेल्या योजनेमध्ये सेवानिवृत्त न्यायाधीश आणि त्यांच्या आतेभावाला बिल्डरने 45 लाखांचा गंडा घातला आहे. या प्रकरणी कंपनीच्या दोन संचालकांविरोधात प्रतापनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रविंद्र बालाची गोविंदवार (रा. ड्रिम रेसिडेंसी, गावंडे लेआऊट), अनिल मधुकर आसेगावकर (रा. मनोहरा, सुरेंद्रनगर) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी 'मॅग्नीटॉन इफ्रा' या नावाने कंस्ट्रक्शन कंपनी सुरु करीत यातून फ्लॉट क्र. 10 खसरा क्र. 26,28,29, मौजा भामटी, सर्वे नं. 15 व 18, रेंगे नगर येथे 'फोरअॅड्रेस' नावाच्या योजनेतून बहुमजली इमारतीचे बांधकामाची सुरुवात केली होती. त्यामध्ये सेवानिवृत्त न्यायाधीश असलेले लक्ष्मण मुकुंदराव गजभिये (वय 67, रा. मिलिंद कॉम्पलेक्स, अंबाझरी) आणि त्यांचा आतेभाऊ राजेंद्र बाबुराव पाचभावे (रा. मानकापूर) यांनी सातव्या माळयावरील फ्लॅट बुक केला. त्यासाठी त्यांनी दोघांच्याही संयुक्त खात्यात 35 लाख रुपये आरटीजीएसद्वारे पाठविले.

## 10 वर्षांपासून फरार झालेल्या आरोपीस अखेर नालासोपारा पोलिसांनी केले जेरबंद




नालासोपारा - बलात्कार करुन आत्महत्येस प्रवृत्त करणा-या व १० वर्षांपासुन फरार असलेल्या आरोपीस जेरबंद गुन्हे शाखा, कक्ष ३ ची कामगिरी. अधिक माहितीनुसार मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीतील दाखल गंभिर गुन्हयातील पाहिजे व फरार आरोपींची शोध मोहिम राबविण्याचे मा. वरिष्ठांनी पोलीस पथकास सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने कार्यवाही करीत असताना, दिनांक १४/०२/२०१३ रोजी ते दिनांक २०/०४/२०१३ रोजी डॉन लेन, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व) येथे आरोपी सुलतान ऊर्फ राजा नुरमोहम्मद शेख याने फिर्यादी यांची मुलगी वय १९ वर्षे हिस कोल्ड्रींकमधून गुंगीकारक औषध पिण्यास देवून ती बेशुध्द अवस्थेत असताना तिच्यावर बलात्कार केला होता,

त्यामुळे ती गरोदर राहून तिने सदरची माहिती आरोपीस सांगितल्याने आरोपीने तिला तु इतर कोणास सांगितले तर तुझा एमएमएस सर्वांना दाखवेल अशी धमकी देवुन मारहाण व शिवीगाळी केली होती. सदर घटनेमुळे फिर्यादी यांच्या मुलीने भितीने अंगावर रॉकेल टाकुन स्वःतास पेटवुन घेतल्याने ती मयत झाली होती. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक २२/०४/२०१३ रोजी नालासोपारा पोलीस ठाणे येथेहा गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपी सुलतान ऊर्फ राजा नुरमोहम्मद शेख, वय २९ वर्षे, रा. रेहमतनगर, नालासोपारा पुर्व याचा गुन्हे शाखा, कक्ष ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांच्या मार्फतीने मिळालेल्या माहितीच्या आधारे शोध घेवून नमूद गुन्हयात दिनांक ०१/१०/२०२२ रोजी ताब्यात घेतले व त्याचा प्राथमिक तपास केला असता त्याने तो मागील ९ वर्षापासुन उत्तर प्रदेश व पश्चिम बंगाल येथे आपले अस्तित्व लपवुन दडुन राहत असल्याचे सांगितले. नमूद आरोपीस पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक श्री. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सागर बारवकर, सचिन घेरे, पो.ना. मनोज सकपाळ, पो.अं. अश्विन पाटील, सुमित जाधव यांनी पार पाडलेली आहे.

## सावधान ! क्रेडिट कार्ड वापरताय

### सायबर गुन्हे कक्ष यांच्याकडून नागरिकांना सावधानतेचा इशारा

**भाईंदर : Axis Credit Card अपडेट करण्याचे सांगून फसवणूक केलेल्या रक्कमपैकी ७९,४००/ रुपयाची रक्कम परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश**



मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नालासोपारा परिसरात राहणारे रहिवाशी यांना अनोळखी इसमाने फोन करुन " तुमचे क्रेडीट कार्ड अपडेट करण्याचे आहे सांगून फोनद्वारे आपले काही डिटेल्स लागतील." असे सांगून तक्रारदार यांचे बँकेची माहिती घेवून बँक खात्यामधून ९९,२००/- रुपये रक्कम काढून घेण्यात आलेबाबत तक्रार अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिनांक २३/०९/२०२२ रोजी प्राप्त झाला होता.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे बँक ट्रॅन्झक्शनची माहीती प्राप्त करुन त्याचे अवलोकन करता तक्रारदार यांची फसवणूक रक्कम मोबिक्वीक या प्लॅटफॉर्मवर गेल्याचे दिसून आल्याने संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन तक्रारदार यांच्या फसवणूक झालेल्या रक्कमेपैकी ७९,४००/- रुपये पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आले आहे.

अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी... .

- अशा प्रकारे फसव्या कॉलला उत्तर देवू नका.
- कॉल आलेल्या व्यक्तीकडे आपले बँक खाते, जन्म दिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नका.
- कोणत्याही अनोळखी कॉल आल्यास त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.
- कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करु नका.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणी फसवणूक करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार यावी.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.शि. माधूरी धिंडे, सुवर्णा माळी, मसुब आकाश बोरसे यांनी पार पाडलेली आहे.

## मौजमजेसाठी दुचाक्या, मोबाईल चोरायचे; चार जणांना अटक, 16 गुन्हे उघडकीस

दुचाक्या आणि मोबाईल पळवणाऱ्या सराईत चार गुन्हेगारांना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे. मौजमजेसाठी आरोपी मोबाईल आणि दुचाक्या चोरत असल्याचं समोर आले आहे. शांतीनगर पोलिसांनी या आरोपींना शिताफीने बेड्या ठोकल्या आहेत. अटक केल्यानंतर या सराईत गुन्हेगारांची पोलिसांनी कसून चौकशी केली. या आरोपींकडून आतापर्यत 16 गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. तसेच आतापर्यंत आठ लाखांच्यावर मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहिती भिवंडीचे पोलीस उपआयुक्त योगेश चव्हाण यांनी दिली आहे. सुनील उर्फ सोन्या शंकर फुलारे (वय 20 रा.लहुजीनगर,कल्याण) आयाज अली रेहमतअली अन्सारी (वय 38 रा.चिरागनगर घाटकोपर) ,दाऊद शोएब अन्सारी (वय 28 रा गुलजार नगर,



भिवंडी) , सर्फराज रेहमतअली खान (वय 26 रा.भिवंडी) असे बेड्या ठोकलेल्या सराईत गुन्हेगारांची नावे आहेत. भिवंडी शहरात वाहन चोरीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असतानाच, शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतुनही मोठ्या संख्येने दुचाक्या व मोबाईल पळविण्याच्या घटना घडत होत्या. या घटना रोखण्यासाठी शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची वेगवेगळी पथके नेमली. वाहन चोरी, मोबाईल चोरी व चैन स्नाचिंग च्या दाखल गुन्ह्यांचा तपास करीत असताना या पथकाने सुनील उर्फ सोन्या शंकर फुलारे, आयाज अली रेहमतअली अन्सारी, दाऊद शोएब अन्सारी, सर्फराज रेहमतअली खान या चार जणांना विविध ठिकाणावरून सापळा रचत बेड्या ठोकल्या आहेत.

## लग्नाला नकार दिल्याने महिलेला संपवलं, थरारक पाठलाग करून पोलिसांनी संशयिताच्या मुसक्या आवळल्या




कोल्हापुरातील कसबा बावड्यात धक्कादायक घटना समोर आलीय. बावड्यातील शहाजीनगरमध्ये गळा चिरून महिलेची हत्या करण्यात आलीय. कविता प्रमोद जाधव (वय 44, रा. तारळे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) असे हत्या झालेल्या माहिलेचे नाव आहे. संशयिताने कोयत्याने कविता यांचा गळा चिरून त्यांची हत्या केलीय. हत्या करून फरार होण्याच्या प्रयत्नात असलेल्या राकेश शामराव संकपाळ (वय 32, रा. शहाजीगर, कसबा बावडा) याला पोलिस अधिकारी किरण भोसले यांनी पाठलाग करून पकडले आहे. शाहुपुरी पोलीस ठाण्यात या हत्येबाबत संकपाळ याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलाय. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कसबा बावडा येथील लाईन बझार येथे राहणाऱ्या राकेश याचा फर्निचरचा व्यवसाय आहे. कविता या त्याच्या नात्यातीलच असल्याने या दोघांची ओळख होती. चार वर्षापूर्वी कविता यांच्या पतीचा मृत्यू झाला आहे. त्यावेळीपासून त्या शिवणकाम व इतर रोजगार करून कुटुंबाचा उदरविर्वाह चालवत होत्या. आरोपी राकेश संकपाळ याने कविताचे पती मयत झाल्यापासून तिच्या घरी येणे- जाणे वाढवून तिच्यासोबत चांगले संबंध निर्माण केले होते. त्यातून दोघे एकमेकांकडे येत जात होते. दोघांचे संबंध वाढल्याने आरोपी राकेश याने तिला आपल्यासोबत लग्न करण्याची मागणी करत रोता. परंतु कविता लग्न करण्यास तयार नव्हती. यातून दोघांमध्ये वारंवार वाद होत असत.

## मिरा भाईदर,वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे द्वितीय वर्धापनाच्या औचित्यावर विविध उपक्रमांचे आयोजन.





दिनांक १/१०/२०२२ रोजी मिरा भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेस दोन वर्ष पुर्ण झाल्याने दिनांक १/१०/२०२२ ते ७/१०/२०२२ पावेतो पोलीसांचे वतीने रक्तदान शिबीर, नशामुक्ती करिता जनजागृती कार्यक्रम, आरोग्य शिबीर, वृध्दाश्रमांना भेटी, विद्यार्थी व नागरिकांना कायदेविषयक माहिती होण्यासाठी जनगजागृती अभियान, वाहतूक नियमनाकरिता जनजागृती अभियान अशाप्रकारचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आज दिनांक ३/१०/२०२२ रोजी आचोळे पोलीस ठाणे यांच्या वतीने जे बी एस स्कूलमधील विद्वार्थी व पोलीसांनी a g a r चंदननाका संगम मेडिकल सनशाईन अल्कापुरी अशी नशामुक्ती प्रभात फेरी काढण्यात आली. त्याचप्रमाणे एस. के. सी. स्कूल, आचोळे डोंगरी नालासोपारा पूर्व येथील विद्यार्थ्यांना महिला विषयक कायदे, सायबर गुन्हे, महिलांनी आत्मरक्षण कसे करावे तसेच पोलीसांच्या डायल ११२ या प्रणालीबाबत जनजागृती करुन मार्गदर्शन केले. वसई पोलीस ठाणे यांच्या वतीने हुजेफा कॉलेज, कोळीवाडा येथिल विद्यार्थ्यांना नशेचे दुष्परिणाम व नशामुक्ती या विषयांवर मार्गदर्शनपर शिबीर आयोजति करण्यात आले होते. सदरवेळी नशामुक्ती या विषयावर श्री विजय मेहता, कृपा फांऊडेशन काऊंसलर यांनी मार्गदर्शन केले असून सदरवेळी कॉलेजचे १५० विद्यार्थी हजर होते. वसई पोलीस ठाणे यांचे वतीने हुजेफा कॉलेज येथील आयोजित नशामुक्ती मार्गदर्शन कार्यशाळा. माणिकपुर पोलीस ठाणे येथील कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्याकरिता वेलनेस कोच व दुमना चॅरिटेबल ट्रस्ट यांचे मार्फतीने आरोग्यवर्धक व्याख्यान व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमादरम्यान तणावपूर्ण जीवन, वाढलले वजन कमी करणे तसेच योग्य आहार कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी पोलीस अधिकारी/अंमलदार, होमगार्ड तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान उपस्थित होते.



# 'मंकीपॉक्स'मुळे उद्भवतात मानसिक समस्या

**जगभर 'मंकीपॉक्स'च्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. या रुग्णांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. आता तर एका अभ्यासात आणखी चिंताजनक बाब समोर आली आहे. मंकीपॉक्समुळे न्यूरॉलॉजिकल आणि मानसिक समस्याही उद्भवू शकतात.**

मंकीपॉक्सने ग्रस्त रुग्णाच्या त्वचेवर पुरळ उठते. 'मंकीपॉक्स' पासून संरक्षण करण्यासाठी चेचक लस प्रभावी आहे; परंतु चेचक लसीकरण झालेल्या रुग्णांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या आढळल्या आहेत. लंडनच्या 'क्वीन मेरी युनिव्हर्सिटी'च्या शैक्षणिक फाउंडेशनचे डॉ. जेम्स ब्रंटन बॅडेनॉक यांनी या अभ्यासाविषयी सांगितलं की, हा अभ्यास 'मंकीपॉक्स'ची लागण झालेल्या लोकांमध्ये न्यूरॉलॉजिकल किंवा मानसिक समस्या शोधण्यासाठी करण्यात आला होता. हा अहवाल 'क्लिनिकल मेडिसीन'मध्ये प्रसिध्द झाला आहे. 'मंकीपॉक्स'च्या संपर्कात आलेल्या रुग्णांमध्ये मेंदूची जळजळ, एन्सेफलायटीससह न्यूरोलॉजिकल समस्या विकसित होतात. मेंदूच्या गंभीर आणि दुर्मीळ समस्यांबरोबरच डोकेदुखी, स्नायू दुखणे आणि थकवा यासारखी लक्षणे 'मंकीपॉक्स'ने संक्रमित लोकांमध्ये आढळतात.

मेंदूच्या गंभीर आणि दुर्मीळ समस्यांव्यतिरिक्त रुग्णांमध्ये डोकेदुखी, स्नायू दुखणे आणि थकव्यासह अधिक सामान्य न्यूरोलॉजिकल लक्षणे आढळली आहेत. 'मंकीपॉक्स' असलेल्या लोकांच्या व्यापक गटामध्ये ही लक्षणे किती गंभीर होती हे अभ्यासावरून स्पष्ट झाले नाही. मंकीपॉक्स असलेल्या किती लोकांना चिंता आणि नैराश्यासारख्या मानसिक समस्या होत्या, हेदेखील स्पष्ट झाले नाही. मंकीपॉक्सची लागण झालेल्या लोकांमध्ये या न्यूरोलॉजिकल समस्या कशामुळे झाल्या, यावर अभ्यास सुरू असल्याचे संशोधकांनी सांगितले. या विषाणूमुळे या समस्या उद्भवत असतील तर त्याच्या अंतर्गत असलेल्या जैविक प्रक्रिया अस्पष्ट आहेत आणि व्हायरस थेट मज्जासंस्थेवर परिणाम करू शकतात. बहुतेक आकडेवारी पश्चिम आफ्रिकेतली होती आणि रुग्णालयात दाखल झालेल्या लोकांना संसर्ग झाला आहे.

कोरोनाचा परिणाम उत्तर अमेरिका आणि पश्चिम युरोपवर झाला आहे. तिथल्या नागरिकांमध्ये एक चतुर्थांशपेक्षा जास्त डोकेदुखी आढळली. 'न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन'मध्ये केलेल्या अभ्यासात सध्याच्या उद्रेकामुळे प्रभावित १६ देशांमधल्या ५०० हून अधिक लोकांचा समावेश आहे. 'एन्सेफलायटीस'ची कोणतीही प्रकरणे नोंदवली गेली नसली तरी 'मंकीपॉक्स' असलेल्या दहापैकी एक चतुर्थांश लोकांमध्ये डोकेदुखीची लक्षणे होती. तथापि, स्पेनमध्ये 'मंकीपॉक्स'ची लागण झालेल्या लोकांमध्ये नुकतीच 'एंसेफलायटीस'ची दोन प्रकरणे नोंदवली गेली आहेत. 'मंकीपॉक्स'चा प्रादुर्भाव हा जागतिक चिंतेचा विषय आहे. सर्व लोकांसाठी लसीकरणाच्या उपलब्धतेसह सार्वजनिक आरोग्य उपायांची आवश्यकता आहे.



**एखादी व्यक्ती काम करत असताना किंवा आराम करत असताना अचानक बेशुद्ध पडतो आणि त्याचा मृत्यू होतो. मृत्यूचे कारण हे हृदयविकाराचा झटका. पूर्वी वयाची साठी-सत्तरी ओलांडलेल्यांना हार्टअॅटॅक यायचा. आता चाळीशीतील तरुण हृदयविकाराच्या झटक्याने जात आहेत. यामध्ये धडधाकट आणि नियमित व्यायाम करणाऱ्या मंडळींचाही समावेश आहे. अनेकजण याचा कोरोनाशी संबंध लावत आहेत. कारण काहीही असले तरी यातून शिकण्यासारखी बाब म्हणजे हृदयाचे आरोग्य जपले पाहिजे.**





# चिंता वाढत्या हृदयविकाराची

प्रसिद्ध पंजाबी गायक गुरदास मान याचे जगभरात गाजलेले एक गीत आहे. 'दिल दा मामला है...' हे गीत पुन्हा चर्चेत आले आहे. हे गीत पुन्हा रिमिक्स होऊन लोकप्रिय झाले नाही तर आजकाल सोशल मीडियावर काही धक्कादायक व्हिडिओ आणि बातम्या व्हायरल होत आहेत. हसत खेळत असताना काही लोकांना हृदयविकाराचा झटका येत असून त्यात त्यांचा मृत्यूही झाल्याचे घडले आहे.

दक्षिण चित्रपटातील सुपरस्टार पुनीत राजकुमार याचा हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले, तेव्हा चित्रपटनगरीच नाही तर सामान्य नागरिकही हादरले. कारण चाळीशीचे असणारे पुनीत राजकुमार हे आरोग्याबाबत सजग होते. तरीही त्यांना हृदयविकाराचा झटका आला कसा, यावरून देशभरात चर्चा सुरू झाली. आताही अशाच प्रकारच्या चर्चेला जोर धरला आहे. साधारणपणे हृदयविकाराचा झटका किंवा कार्डियाक अरेस्ट हे वयाची ६० ओलांडलेल्या नागरिकांत दिसून येते. हृदयविकाराचा झटका येण्यामागे अन्य प्रमुख कारणांपैकी मधुमेह, रक्तदाब हे एक महत्त्वाचे कारण आहे. दोन्ही आजार असलेल्या रुग्णांत हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता अधिक राहाते. तसेच धूम्रपान करणाऱ्या मंडळींनादेखील हृदयविकार कधी होतो, हे कळतही नाही. म्हणूनच सिगारेट ओढणाऱ्यांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता ही अन्य व्यक्तींच्या तुलनेत तीनपट अधिक राहाते. धूम्रपान करणाऱ्यांना जेव्हा हृदयविकाराचे आकलन होते, तेव्हा खूप उशीर झालेला असतो.

वयाच्या ४० व्या वर्षी लोकांना हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमुख कारण हे धूम्रपान आहे. याबरोबरच जी मंडळी तणावात राहतात, नियमित व्यायाम करत नाहीत, अकारण जंकफूडचे सेवन करतात त्यांनादेखील अशा प्रकारचा त्रास होऊ शकतो. धडधाकट व्यक्तीचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याचे आपण कधी ऐकले आहे का? पण आजकाल अशा धक्कादायक बातम्या ऐकावयास आणि पाहावयास मिळत आहेत. एखादी व्यक्ती काम करत असताना किंवा आराम करत असताना अचानक बेशुद्ध पडतो आणि त्याचा मृत्यू होतो. मृत्यूचे कारण हे हृदयविकाराचा झटका. बहुतांश मंडळी या मृत्यूचा कोरोनाशी संबंध लावत आहे. कोरोनाचा दुष्परिणाम म्हणून त्याकडे पाहात आहेत.

अमेरिकेत कोरोनातून बरे झालेल्या रुग्णांपैकी २० टक्के रुग्णांमध्ये हृदयविकाराची लक्षणे आढळून आले आहेत. ज्या लोकांना कोरोना झाला नाही, त्यांच्या तुलनेत हृदयाचे ठोके कमी पडणे, कार्डियाक अरेस्ट होण्याची शक्यता ही ७२ टक्के अधिक दिसून आली. तसेच अन्य नागरिकांच्या तुलनेत स्ट्रोक येण्याची शक्यतादेखील १७ टक्के अधिक दिसून आली.

एका अभ्यासानुसार कोरोनानंतर उद्भवलेल्या अडचणींना लाँग कोविड किंवा दीर्घकाळ चालणारा कोरोना असेही म्हटले जात आहे. यातील सर्वसामान्य लक्षणे म्हणजे थकवा येणे, हृदयाचे ठोके वाढणे, धाप लागणे, स्नायूत अशक्तपणा येणे, जुने दुखणे आदी लक्षणे आहेत. या लक्षणांशिवाय पोटाचे विकारदेखील कारणीभूत ठरू शकतात. ही लक्षणे वेगवेगळ्या वयोगटातील लोकांतदेखील आढळून येतात. यावर वेळीच उपचार केल्यास नियंत्रण मिळवता येऊ शकते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, ९० टक्क्यांपर्यंत प्रकरणांमध्ये सौम्य स्वरुपाची लक्षणे आढळून आली आणि त्यामुळे त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल व्हावे लागले नाही. सौम्य लक्षणांमध्ये डोकेदुखी, स्नायूदुखी, अॅसिडिटीचा समावेश आहे.

आपल्याला अशी लक्षणे दिसत असतील तर अधिक प्रमाणात पातळ पदार्थांचे सेवन करायला हवे. आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढवावे. हे करूनही त्रास वाढल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

आपण दहा टक्के लोकांच्या श्रेणीत असाल आणि सतत खोकला येत असेल, धाप लागत असेल तर हे हृदयविकाराचे लक्षण असू शकते. अशावेळी तत्काळ डॉक्टरांशी संपर्क करावा. तेथे एक्स-रे आणि सीटी स्कॅन केल्यानंतर त्या रिपोर्टच्या आधारे उपचाराची दिशा निश्चित होईल. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही चाचणी मनाने करू नका. कारण तपासणीच्यावेळी शरीरात जाणाऱ्या किरणांचा दुष्परिणाम नक्कीच होतो. गेल्या काही दिवसांतील जगभरातून आलेल्या बातम्या पाहता अनेकांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचे दवाखान्यात नेण्यापूर्वीच निधन झाले. गायक केके याचेही उदाहरण आपल्याला पाहाता येईल.

कोरोनाचा परिणाम हृदयाच्या कार्यक्षमतेवर होत आहे. मग घटना दक्षिण कोरियातील का असेना. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात देशातील विविध भागात अशा धक्कादायक घटना घडल्याचे निदर्शनास आले. बरेली, जम्मू आणि मैनपुरी येथे तीनजणांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. एका व्यासपीठावर नृत्य करताना कलाकार खाली कोसळला आणि तो परत जागा झालाच नाही. अशा घटना पद आणि प्रतिष्ठा पाहात नाहीत. म्हणून हृदयासंबंधीच्या कोणत्याही त्रासाकडे दुर्लक्ष करू नका आणि सजग राहा.

# बॅरियाट्रिकशस्त्रक्रियेनंतर...

वजन नियंत्रणात ठेवणे ही काळाची गरज आहे. जास्त वजन असल्यास बॅरियाट्रिक शस्त्रक्रिया करून घेण्याचा सल्ला दिला जातो. या शस्त्रक्रियेनंतर रुग्णांने आरोग्याची अधिक काळजी घ्यावी लागते. तसेच नियमित व्यायाम तसेच शारीरिक हालचाल करणेही आवश्यक असते. बॅरियाट्रिक शस्त्रक्रियेनंतर पुन्हा निरोगी आयुष्य जगण्यासाठी पोषक आहारासोबतच शारीरिक हालचालही तितकीच महत्त्वाची ठरते. वजन कमी केलेल्या रुग्णांनी योग्य आहार तर घ्यायलाच हवा. शिवाय नियमित व्यायामही करायला हवा. वजन कमी झाल्यानंतर काही शारीरिक समस्या निर्माण होतात. स्नायू कमकुवत होणे ही अशीच एक समस्या. मात्र, नियमित व्यायामाने स्नायू बळकट राहू शकतात. यासोबतच शारीरिक हालचालीमुळे चयापचय क्रियेचा वेग वाढून आराम करत असतानाही शरीराची कॅलरी खर्च करण्याची प्रक्रिया सुरू राहते. बैठी जीवनशैली असणाऱ्या रुग्णांनी शस्त्रक्रियेआधीच चालायला सुरूवात करायला हवी, असा सल्ला तज्ज्ञ देतात. दिवसभरात फक्त दहा मिनिटे चालायला सुरूवात केली तरी तुम्ही शस्त्रक्रियेनंतर नियमितपणे चालू शकता. शस्त्रक्रियेआधी चालायला सुरूवात केली तर चांगली सवय लागते आणि शस्त्रक्रियेनंतर व्यायाम सुरू करणे तापदायक ठरत नाही.

बॅरियाट्रिक शस्त्रक्रियेनंतर रुग्णांनी व्यायाम सुरू करायला हरकत नाही. शस्त्रक्रियेनंतर सहा तासांनी २० ते २५ मिनिटे चालता येईल. उन्हाळ्यात किंवा आर्द्र वातावरणात घरात ट्रेडमीलवर चालणे योग्य ठरेल. यामुळे डिहायड्रेशनचा त्रास टाळता येऊ शकतो. काही काळानंतर रुग्ण चालण्याचा कालावधी वाढवू शकतात. रुग्णांनी दिवसाला ४० ते ६० मिनिटे चालायला हरकत नाही, असे या क्षेत्रातले तज्ज्ञ सांगतात. या शस्त्रक्रियेनंतर आहारावर मर्यादा आल्या तरी रुग्ण ३० ते ४५ मिनिटे अगदी सहज चालू शकतो, असेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तसेच दगदग टाळण्यासाठी दिवसभरात थोडेथोडे चाला. शस्त्रक्रियेनंतर हळूहळू चालण्याचा वेग आणि कालावधी वाढवा, असे तज्ज्ञ सांगतात. शस्त्रक्रियेनंतर साधारण दोन ते तीन आठवड्यांनी तीव्र स्वरुपाचा व्यायाम सुरू करायला हरकत नाही. मात्र पावले अगदी हळूहळू टाका, असेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



# जादा तापमान, अतिथंडीमुळे व्यक्ती होतात शीघ्रकोपी

**तापमानाचा मनाशी आणि वागण्याशी थेट संबंध असतो. जास्त उष्णता किंवा थंडी राग आणि द्वेष निर्माण करतात. १२ ते २१ अंश सेल्सिअस तापमानात व्यक्ती सर्वोत्तम मूडमध्ये असतात. या काळात रागही कमी येतो.**

लॅन्सेट प्लॅनेटरी हेल्थने तापमानानुसार ७७३ शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या वर्तनाचा अभ्यास केला. यामध्ये असे आढळून आले की, बाहेर खूप गरम किंवा अतिथंड तापमान असते तेव्हा मानवांमध्ये राग वाढतो आणि ते शारीरिकरीत्या राग किंवा द्वेष दाखवू शकत नाहीत, तेव्हा ऑनलाइन व्यक्त होतात. हवामानातील बदल हे द्वेषयुक्त बोलण्यामागील एक कारण आहे. अहवालात म्हटले आहे की उष्णतेच्या लाटेदरम्यान, ऑनलाइन द्वेषयुक्त भाषण किंवा द्वेषयुक्त मजकुराच्या प्रकरणांमध्ये लक्षणीय वाढ झाली. संशोधकांचे म्हणणे आहे की, अमेरिकेतील २५ टक्के कृष्णवर्णीय आणि दहा टक्के हिस्पॅनिक लोक ऑनलाइन द्वेषयुक्त भाषणाला सर्वाधिक बळी पडले आहेत. हवामानातल्या बदलामुळे तृतीयपंथी समुदायातल्या लोकांवर चौपट द्वेषपूर्ण टीका होते. 'पॉट्सडॅम इन्स्टिट्यूट फॉर क्लायमेट इम्पॅक्ट रिसर्च'च्या लिओनी वेन्झ यांच्या नेतृत्वाखाली 'द लॅन्सेट प्लॅनेटरी हेल्थ'च्या टीमने मे २०१४ ते मे २०२० या सहा वर्षांमध्ये अमेरिकेतल्या ४०० दशलक्ष ट्वीट्सचे परीक्षण केलं गेलं. यासाठी, त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेसह एक अल्गोरिदम तयार केला. त्यामुळे द्वेषयुक्त भाषण ओळखता आलं. यामध्ये सात कोटी ५० लाख ट्वीट म्हणजेच एकूण ट्वीट्सपैकी दोन टक्के स्पीचचे होते.

टीमने कोणते ट्वीट कोणत्या भागातील होते आणि त्यादिवशी तिथले हवामान कसे होते ते तपासले. तापमान १५ ते १८ अंश सेल्सिअस होते, तिथे द्वेषयुक्त ट्वीटमध्ये किंचित वाढ झाली. -३ ते -५ अंश सेल्सिअस तापमानात राहणाऱ्या लोकांनी इतरांपेक्षा १२.५ टक्के अधिक द्वेषयुक्त भाषण ट्वीट केले. ४२ ते ४५ अंश सेल्सिअस तापमान असलेल्या वाळवंटी भागात द्वेषयुक्त भाषणे असलेले ट्वीट २२ टक्क्यांनी वाढले. या अभ्यासाचा भाग असलेले आंद्रेस लिव्हरमन म्हणतात की, उच्च सरासरी उत्पन्न असलेल्या भागातही तापमान वाढते तेव्हा लोक संतप्त द्वेषयुक्त ट्वीट करतात. या संशोधनासाठी संयुक्त राष्ट्राच्या द्वेषयुक्त भाषणाची व्याख्या मानक म्हणून घेण्यात आली. यानुसार, धर्म, वंश, राष्ट्रीयत्व, रंग, लिंग, कोणत्याही ओळखीच्या आधारावर कोणत्याही व्यक्ती किंवा समूहावर कोणत्याही प्रकारची अपमानास्पद टिप्पणी द्वेषयुक्त भाषणात मोडते. एका गट, समुदायाला आक्षेपार्ह वाटणाऱ्या टिप्पण्यांचे वर्गीकरण करण्यात अडचण आली.

## डाएट सोडा, डोळ्यांसाठी मारक!

फसफसणारी पेये, सोडा आरोग्यासाठी किती घातक असतात, हे आपण जाणतो. मात्र कोल्डड्रिंक, सोडा पिण्याचे प्रमाण कमी होत नाही. काहीजण मानसिक समाधानासाठी डाएट सोडा, डाएट शीतपेये पितात. मात्र, प्रत्यक्षात डाएट सोडा किंवा फसफसणाऱ्या पेयांमुळे डोळ्यांचे नुकसान होऊ शकते. डाएट सोडाच्या अतिरेकामुळे डाएबिटिक रेटिनोपॅथी हा डोळ्यांचा विकार जडू शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. इतकेच नव्हे तर आठवड्याभरात चार कॅन किंवा दीड लीटर फसफसणारी पेये प्यायल्यास डायबेटिक रेटिनोपॅथी जडण्याची शक्यता दुपटीने वाढत असल्याचेही संशोधनातून समोर आले आहे.

फसफसणारी पेये (सॉफ्ट ड्रिंक्स) आणि डोळ्यांचे आरोग्य यांच्यात खूप जवळचा संबंध असल्याचे दिसून आले. ६०९ प्रौढांवर हे संशोधन करण्यात आले. **(पान ७ वर)**

# समस्या रंगांधळेपणाची



**रंगांधळेपणाचा त्रास हा महिलांच्या तुलनेत पुरुषांमध्ये अधिक दिसून येतो. यात एखाद्या व्यक्तीचे डोळे काही रंगांना पाहू शकतात, तर काहींना अजिबातच रंग दिसत नाहीत. महिलांच्या तुलनेत पुरुषांना रंगांधळेपणाचा त्रास अधिक का असतो, हे जाणून घेऊ या...**

रंगांधळेपणा ही आनुवांशिक स्थिती आहे. ती स्थिती एक्स क्रोमोसोव्हमुळे निर्माण होते. एक्स-क्रोमोसोम आणि वाय क्रोमोसोम असणाऱ्या लोकांना अशा प्रकारचा त्रास होण्यासाठी केवळ एक एक्सची गरज असते. या प्रकारच्या आनुवांशिक पॅटर्नला एक्स लिंक्ड इनहेरिटस असेही म्हटले जाते आणि प्रामुख्याने त्याचा परिणाम पुरुषांवर होतो.

**रंगांधळेपणाची कारणे :**

रंग ओळखण्यास मदत करणाऱ्या मेंदूच्या किंवा डोळ्याच्या भागाला मार लागल्यास रंगांधळेपणाचा त्रास होऊ शकतो.

डोळ्याचे आजारपण. उदा. ग्लुकोमा, मॅक्लूलर डिजनरेशन

मेंदू आणि नर्व्हस सिस्टिमचे आजारपण जसे अल्जामयर

स्क्लेरोसिस. काही मेडिसीनमुळे जसे की प्लाक्वेनिल. डोळे किंवा मेंदूला मार लागणे.

वयपरत्वे रंग ओळखण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. विशेषत: मोतिबिंदू झाल्यानंतर

**रंगांधळेपणा कसा ओळखावा?**

रंगांधळेपणाचे निदान करण्यासाठी जपानच्या एका प्राध्यापकाने पद्धत विकसित केली आहे. त्यास इशिहारा चेक असे म्हणतात. यात डॉट्सपासून नंबर तयार केला जातो आणि त्याच्या आसपास डॉट्सच्या तुलनेत एक वेगळा रंग असतो. जपानच्या टोकिओ कॉलेजचे प्रोफेसर शिनोबू इशिहारा यांच्या नावाने ही प्रक्रिया ओळखली जाते. त्यांनी १९१७ मध्ये या अभ्यासाचा खुलासा केला आणि विश्लेषण केले. अनेक संशोधनांती त्यांनी निश्चित केलेले बारा पॉइंटस्चे रंग हे रंग ओळखण्याची क्षमता किती आहे, हे दाखवून देतात असे सिद्ध झाले.

**उपचारांचे काय?**

रंगांधळेपणावर कोणताही उपचार नाही. परंतु हा आजार पहिल्या टप्प्यात असेल तर काही प्रमाणात त्यात सुधारणा करता येऊ शकते. काही रंगीत चष्म्याचा वापर करून काही प्रमाणात त्रास दूर करता येतो. मात्र, कायमस्वरुपी उपचार करणे अशक्य आहे.

**रंगांधळेपणा ओळखण्यासाठी चार चाचण्या**

मुलांतील रंगांधळेपणाचा दोष ओळखण्यासाठी विशेष अशा चाचण्या करण्यापेक्षा तो रंगासंबंधी किंवा वस्तूंसंबंधी विचारलेल्या प्रश्नांना कशी उत्तरे देतो, याचे निरीक्षण करणे आवश्यक ठरते. अनेक शाळांकडून अशा प्रकारच्या चाचण्या घेतल्या जातात.



## संपादकीय...

# मी, माझे, मला?

आपल्या कृती नैतिकदृष्ट्या योग्य आहे की अयोग्य यासंबंधीचे नीतिमीमांसेत जे निकष सुचवलेले असतात, ते आपल्याला एखाद्या परिस्थितीत काय करणे योग्य ठरेल याचा निर्णय घ्यायला मार्गदर्शन करतात; तसेच दुसऱ्या कुणाची कृती बरोबर का चूक हे ठरवायला मदत करतात. या दोन्ही प्रकारात निव्वळ भावनेच्या आहारी न जाता काही बुद्धिनिष्ठ निकष वापरल्याने आपण निष्पक्षपातीपणे निर्णय घेऊ शकतो. अर्थात, जो निकष आपल्या कृतीची निवड करताना लावायचा, तोच दुसरीच्या कृतीचे मूल्यमापन करताना लावायचा हे भान असायला हवे. पाश्चात्य नीतिमीमांसेत कृतीची नैतिकता ठरवण्यासाठी मुख्यत: कृती करण्याचा हेतू आणि कृतीचे परिणाम या दोन निकषांचा विचार केला आहे.

पहिल्या प्रकारच्या सिद्धांतांना कर्तव्यवादी म्हणतात. त्यात कृती योग्य आहे की नाही यालाच महत्त्व असते. जी कृती करण्यामागे कर्तव्य करण्याचा उद्देश असतो, ती कृती योग्य असते अशी ही भूमिका आहे. पण आपले कर्तव्य काय, हे कसे ठरवायचे हा प्रश्न निर्माण होतो. अनेकदा आपण जे नीतिनियम शिकलेले असतो, त्यांचा आधारे आपले कर्तव्य काय ते ठरवतो, आणि पार पाडतो. पण सगळे नियम नेहमीच योग्य असतात असेही नाही. बहुतेक नियम स्थळ-काळाप्रमाणे बदलणारे असतात. स्वाभाविकच आहे. कारण विशिष्ट परिस्थितीत समाजासाठी काय चांगले ठरेल याबद्दल नियम तयार करणाऱ्यांचे, नियम लागू करणाऱ्यांचे जे आकलन असते, त्यानुसार ते तयार करतात. परिस्थितीत महत्त्वाचे बदल झाल्यावर नियम बदलण्याची लवचिकता समाज व्यवस्थेमध्ये नसेल, तर कालबाह्य नियम समाजाचे नुकसानच करतात. त्याखेरीज अनेकदा परिस्थिती गुंतगुंतीची असेल तर दोन नियमांमध्ये संघर्ष होतो.

हे नियम ज्या कृती करायला सांगतात, त्या परस्परविरुद्ध असतात. कोरोनाचा संसर्ग झाल्याचे कळल्यावर त्या व्यक्तीने जर आपल्याला विनंती केली, की हे माझ्या जोडीदाराला कळू देऊ नकोस, तर आपण काय केले पाहिजे? सांगावे, तर कुणाचा विश्वासघात करू नये या नियमाचा भंग होतो. पण नाही सांगितले तर जाणून-बुजून एखाद्याच्या जीवाला धोका निर्माण करू नये हा नियम मोडतो. असे पेच सर्वांनीच अनुभवलेले असतात. प्रचलित नियमांवर विसंबून राहण्यात निर्माण होणाऱ्या या त्रुटी कांट यांच्या कर्तव्यवादी सिद्धांताच्या संदर्भात पुढे येत नाही. कारण त्यांनी मांडलेली निरुपाधिक आदेशाची संकल्पना स्थळ-काळ-व्यक्ति-परिस्थिती निरपेक्ष आहे.

कृतीच्या परिणामांवर कृतीची नैतिक योग्यायोग्यता ठरवणाऱ्या दुसऱ्या प्रकारच्या सिद्धांतांना 'परिणामवादी' म्हणतात. हे सिद्धांत असे मानतात की ज्या कृतीचे परिणाम चांगले, ती कृती चांगली आणि तीच नैतिकदृष्टीने योग्य. ज्या कृतीचे परिणाम वाईट, ती कृती वाईट आणि नैतिकदृष्ट्या अयोग्य. इथे प्रश्न येतो की परिणाम चांगले आहेत हे कुणी आणि कशाच्या आधारे ठरवायचे? 'चांगले' म्हणजे काय? आणि हे परिणाम कुणासाठी चांगले असले पाहिजेत? फक्त कृती करणाऱ्यासाठी की केवळ इतरांसाठी की एकंदरीत सगळयांसाठीच? स्वतःच्या हिताचा विचार करण्यात तसे काहीच चुकीचे नाही. 'मानसशास्त्रीय अहंकेंद्रवाद' असे सांगतो की प्रत्येक जण वास्तवात स्वतःच्या हिताचा विचार करूनच वागतो. फक्त स्वतःचा विचार करून वागण्याला आपण स्वार्थी वर्तन म्हणतो.

पण नीतिमीमांसेत 'नीतिशास्त्रीय अहंकेंद्रवाद' असाही सिद्धांत मांडला आहे. त्यासाठी असे युक्तिवाद केले जातात की प्रत्येकाने स्वतःचे हित जपले तर सर्वांचेच हित जपले जाऊ शकते. त्याचप्रमाणे माणसांचे हित एकमेकांत नेहमीच गुंतलेले असल्यामुळे आपले हित जपताना इतरांचे हित जपावेच लागते हे व्यावहारिक सत्य आहे. या सिद्धांतात मोठी त्रुटी अशी आहे की समाजात वेगवेगळया व्यक्तींचे हितसंबंध बऱ्याचदा परस्परविरोधी असतात. हा स्वहितवादाचा सिद्धांत आपल्या स्वाभाविक नैतिक जाणिवेच्या विरोधी आहे. त्याला पर्यायी अशा सर्वहितवादाचा परिचय पुढच्या लेखात करून घेऊ.

• • •

# ..अजूनही सोन्यावरच भरवसा

सेन्सेक्सने गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात ६२ हजारांची पातळी गाठली तर त्यात उच्चांकी पातळीपासून सुमारे पाच हजार अंशांची घसरण झाली आहे. बाजारातील याच अस्थिरतेला पर्याय म्हणून गुंतवणूकदार आजही गुंतवणुकीचे सुरक्षित आणि शाश्वत गुंतवणुकीचे साधन म्हणून सोन्याकडे बघतात.

अनेक दशकांचा पूर्वेतिहास तपासल्यास, चलनवाढ ही सोन्यातील मागणीला उपकारक ठरत आली आहे. महागाईच्या झळांपासून बचावाचे सोने मजबूत साधन समजले जाते. सुरक्षित आणि महागाईवर मात करणारे गुंतवणुकीचे साधन असल्याने गुंतवणूकदारांकडून सोने खरेदीला प्राधान्य दिले जाते.

सोन्याने चालू वर्षांत आतापर्यंत शेअर बाजार आणि रोख्यांच्या तुलनेत गुंतवणूकदारांना चांगला परतावा दिला आहे. जानेवारी ते ऑगस्टदरम्यान एमसीएक्स गोल्डने ५ टक्क्यांहून अधिक परतावा दिला आहे, तर व्यापक बाजाराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मिडकॅपने ३.४ टक्के, त्याखालोखाल निफ्टीने २.३ टक्के परतावा दिला आहे. करोनाच्या महासाथीमध्ये गुंतवणूक साधनांमध्ये सोन्याची कामगिरी अव्वल राहिली. त्यानंतर सोन्याने गुंतवणूकदारांना २८ टक्क्यांपर्यंत परतावा दिला. मात्र गेल्या वर्षी ४ टक्के नकारात्मक परतावा नोंदण्यात आला होता. तज्ज्ञांच्या मते, रशिया-युक्रेन युद्धामुळे निर्माण झालेला भूराजकीय तणाव, महागाई आणि त्यापरिणामी उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या जागतिक मंदीच्या सावटामुळे सोने हा गुंतवणूकदारांचा पसंतीचा पर्याय राहील. मे महिन्यापासून देशांतर्गत बाजारात सोने मजबूत होत आहे. त्याला ४९,५०० रुपये प्रति दहा ग्रॅमचा मजबूत आधार मिळाला आहे, तर त्याने ५२,७०० रुपये प्रति दहा ग्रॅम रुपयांच्या पातळीवर मजल मारली होती.

सराफाकडून खरेदी ते आता 'डिजिटल' खरेदी अशी सोने गुंतवणुकीत काळानुसार स्थित्यंतरे आली. या दरम्यान भारतीयांचे सोन्यावरील प्रेम कायम राहिले. भारतात सोन्याला वेगवेगळ्या जाती, धर्म आणि संस्कृतींमध्ये वेगवेगळे स्थान आहे. त्यामुळे भारतीयांची सोन्यामध्ये नुसती गुंतवणूक नसते तर भावनिक गुंतवणूक अधिक असते.

सुवर्ण विनिमयमान (गोल्ड स्टँडर्ड) म्हणून होणारा सोन्याचा उपयोग आता मागे पडला असला तरी आर्थिक व्यवहारांतील सोन्याचे महत्त्व आजही टिकून आहे. कारण सोन्याने फक्त भारतीयांनाच नाही तर संपूर्ण जगाला भुरळ घातली आहे. सोन्याच्या अंगी असणाऱ्या वैशिष्ट्यांमुळे सोने सगळ्या गुंतवणुकीच्या साधनांमध्ये अद्वितीय आहे. सोन्याची स्थिरता आणि त्याचे मूल्य या दोन्ही गुणांमुळे ते अक्षरश: अक्षय्य बनते. भारतात अगदी पारंपरिक पद्धतीने सोने खरेदी केली जाते. बहुतांश लोक सराफाकडून सोने खरेदी करतात. खरेदी केलेले सोने मुख्यत: दागिन्यांच्या स्वरूपात असते. त्यामुळे आर्थिक उपयोग न करता ते दररोजच्या वापरासाठी किंवा अडचणीच्या काळात गुंतवणूक म्हणून घेतले जाते. मात्र बऱ्याचदा अडचणीत असताना देखील लोकांचा सोने विक्रीला अखेरचा पर्याय म्हणून बघितले जाते.

आपल्याला सोन्याचे लाभ-जोखीम गुणोत्तर (कमी जोखीम आणि फायद्या-खरेदीची शक्यता अधिक) समजून घेणे आवश्यक आहे. सोन्यामध्ये जोखीम कमी आणि फायदा अधिक असल्यामुळे आपल्या एकूण गुंतवणुकीपैकी काही टक्के गुंतवणूक सोन्यामध्ये दीर्घकाळासाठी करत राहणे कधीही शहाणपणाचे ठरू शकते. गेल्या काही वर्षांत सोन्यातल्या गुंतवणुकीने खूप आकर्षक परतावा दिला नसला तरी निराशदेखील केलेले नाही. गुंतवणुकीचा सुरक्षित आकर्षक पर्याय म्हणून गुंतवणूकदारांच्या यादीमध्ये सोन्याचे स्थान अजूनही वरचे आहे. याचमुळे आजही काही गुंतवणूकदार आपल्या गुंतवणुकीतील काही हिस्सा सोन्यात नियमितपणे करतात.

अगदी सुरुवातीला सोन्याची खरेदी करण्यासाठी सराफ हा एकमेव पर्याय उपलब्ध होता. त्याच्याकडून पारंपरिक स्वरूपात सोने खरेदी केले जात असे. तासनतास बसून सोन्याचे दागिने खरेदी केली जात होते. शिवाय विक्रीच्या वेळी त्यामध्ये पुन्हा घट घेतली जाते. आता मात्र अगदी घरबसल्या आपण 'डिजिटल' माध्यमातून काही मिनिटांत सोने खरेदी करू शकतो. शिवाय त्यावर कोणतीही घट न लागता ते तेवढ्याच वेळेत विकूदेखील शकतो.

### दृष्टिकोन बदलणे आवश्यक

आता सोन्याच्या व्यवसायात ज्यानुसार स्थित्यंतरे आली त्यानुसार आपल्याला सोने गुंतवणुकीच्या बाबतीत दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. बऱ्याचदा दागिने स्वरूपात घेतलेले सोने वर्षांनुवर्षे कपाटात किंवा बँकेच्या लॉकरमध्ये पडले असते. त्यावर काहीच परतावा मिळत नाही. शिवाय ते सोने सांभाळण्यासाठी बँकेला पैसे द्यावे लागतात. अडचणीच्या काळातदेखील सोने विक्री सगळ्यात शेवटचा पर्याय म्हणून बघितला जातो. मात्र आता गरज आहे सोन्याकडे गुंतवणूक म्हणून पाहण्याची. सध्या सोन्यामध्ये गुंतवणूक आणि त्यावर परतावा मिळविणे देखील शक्य आहे.

### सोन्याच्या व्यवसायाची

स्थित्यंतरे आणि पर्याय थोडक्यात बघू या. सोन्याची नाणी/ वळी/ बिस्किट्स- यात दोन प्रकार आहेत.

### कोणतेही 'सर्टिफिकेशन'

नसणारी नाणी/वळी आणि 'सर्टिफिकेशन'सह विकली जाणारी नाणी/बिस्किट्स.

### गोल्ड म्युच्युअल फंड

सध्या ११ म्युच्युअल फंड असा गुंतवणूक पर्याय देत आहेत. 'रेग्युलर' आणि 'डायरेक्ट' या दोन्ही प्रकारे इथे पैसे गुंतवता येतात. यांची 'मॅनेजमेंट फी' ०.२ ते १.४ टक्का इतकी असून गेल्या एक वर्षांचे परतावे ५ ते ९ टक्क्यांदरम्यान आहेत. 'गोल्ड ईटीएफ'प्रमाणे ही गुंतवणूकसुद्धा आर्थिक पद्धतीची असून सोने हातात येत नाही.

### पारंपरिक विरुद्ध 'मॉडर्न' सोने खरेदी (डिजिटल गोल्ड)

सध्या बाजारात 'ऑनलाइन' माध्यमातून देखील 'डिजिटल' सोने खरेदी करता येते. 'डिजिटल पेमेंट' पर्यायांद्वारे किंवा 'इंटरनेट बँकिंग'च्या माध्यमातून शुद्ध सोने खरेदी करता येते. अगदी २० रुपयांपासून ग्राहकांना ही सोने खरेदी करता येते. 'गोल्ड एक्स्चेंज ट्रेडेड फंड'(गोल्ड ईटीएफ):

'गोल्ड ईटीएफ' सोने खरेदीचा एक चांगला पर्याय आहे. म्हणजे सोन्याची युनिट रूपाने विक्री करणे. साधारणपणे एक ग्रॅम सोन्याच्या समतुल्य एक युनिट असते. हा पर्याय म्हणजे 'पेपरगोल्ड' म्हणजे युनिटच्या रूपामध्ये सोने खरेदी करणे. प्रत्यक्ष सोन्याऐवजी 'डिमॅट' खात्यात सोने नावावर जमा होते.

### 'गोल्ड सॉव्हर्जिन बॉण्ड' (सार्वभौम सुवर्ण रोखे)

सध्या सुवर्ण खरेदीसाठी सर्वात आकर्षक आणि लोकप्रिय पर्याय म्हणजे 'गोल्ड सॉव्हर्जिन बॉण्ड' अर्थात सार्वभौम सुवर्ण रोखे आहे. सरकारने प्रत्यक्ष सोन्यातील गुंतवणूक कमी करून ती सरकारी रोख्यांमार्फत अर्थव्यवस्थेमध्ये येण्यासाठी सार्वभौम सुवर्ण रोखे बाजारात आणले आहेत. केंद्र सरकारची हमी असणारे हे सुवर्ण रोखे किमान एक ग्रॅम, व्यक्ती व हिंदू कुटुंब अविभक्त पद्धतीसाठी कमाल चार हजार ग्रॅम; तर ट्रस्ट व तत्सम संस्थांसाठी वीस हजार ग्रॅम वजनाचे सुवर्ण रोखे एका आर्थिक वर्षांत खरेदी करता येतात.सुवर्ण रोख्यांनी किती परतावा दिला?सरकारच्या सार्वभौम सुवर्ण रोखे योजनेने गुंतवणूकदारांना सहा वर्षांत जवळपास सरासरी ८० टक्क्यांहून अधिक लाभ दिला आहे. २०१६-१७ आर्थिक वर्षांत प्रति ग्रॅम २,८९३ रुपये किमतीने जारी केले गेलेल्या सुवर्ण रोख्यांची किंमत सध्या दुप्पट झाली आहे. त्यासाठी मुदतपूर्व पूर्ततेसाठी विमोचन मूल्य ५,०७७ प्रति ग्रॅम निश्चित करण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षांतील पाचव्या मालिकेत प्रति ग्रॅम ५,१९७ रुपयांना विक्री करण्यात आली.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
**Public Works Department**
Indira Gandhi Bhavan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhaindar (W) 401101, Tal. Dis – Thane, 28192828

No.MNP/ PWD / Tender/ 680 / 2022-23 Date - 29 / 9 / 2022

// Tender Notice No. 680 //

Mira – Bhaindar Municipal Corporation Public Works Department are invited tender for various works in MBMC area. The Tender documents are available on MBMC website **https://mahatenders.gov.in** from **03/10/2022** to **17/10/2022** up to **12.00 PM** & submit the tender dully filled on https://mahatenders.gov.in Submission date **18/10/2022** up to **12.00 PM** hrs.

Ref.: MBMC / PRO / 272 / 2022-23
Date : 29 / 9 / 2022

Sign/-
Executive Engineer (Electric)
Mira Bhaindar Municipal Corporation

# राज्य सरकारचं गिफ्ट; BMC,बेस्टचे कर्मचारी, शिक्षक यांच्यासह आरोग्य सेविकांना दिवाळी बोनस जाहीर

**मुंबई,** महापालिकेचे कर्मचारी, महापालिकेचे शिक्षक, बेस्टचे कर्मचारी यांना दिवाळी बोनस जाहीर करण्यात आला आहे. या सर्व कर्मचा-यांना 22 हजार 500 रुपए तर आरोग्य सेविकांना एक पगार दिवाळी बोनस म्हणून दिला जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी याची घोषणा केली.

मुंबई महापालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी तसेच अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बोनस बाबत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे गुरुवारी बैठक झाली. या बैठकीमध्ये कर्मचा-यांच्या दिवाळी बोनसचा निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे मुंबई महापालिकेचे 93 हजार आणि बेस्टचे 29 हजार कर्मचा-यांसह, शिक्षक, आरोग्य सेविका यांना दिवाळी बोनस मिळणार आहे.



'कोविडच्या बिकट परिस्थितीत मुंबई महापालिकेचे कर्मचा-यांनी चांगले काम केले आहे. विकास कामांवर खर्च केलाच पाहिजे पण चांगले काम करणा-यांना प्रोत्साहन दिले पाहिजे' असे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सर्व कर्मचा-यांना ' आनंदात दिवाळी साजरी करा. पण सगळ्यांनी मुंबईकरांसाठी मनापासून काम करा,' असे आवाहन केले.

आज झालेल्या बैठकीला खासदार राहुल शेवाळे, मुंबई महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. आय. एस. चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, माजी आमदार किरण पावसकर, महापालिकेतील विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी आदी तसेच संदीप देशपांडे, शशांक राव, संतोष धुरी, उत्तम गाडे, अशोक जाधव यांच्यासह पालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कोविडच्या बिकट परिस्थितीत महापालिकेच्या कर्मचा-यांनी चांगले काम केले आहे. मुंबईतील कोविडची परिस्थिती नियंत्रणात राखण्यात डॉक्टर्स, सर्व कर्मचारी यांचा मोलाचा वाटा आहे. विकास कामांवर खर्च झालाच पाहिजे. पण चांगले काम करणा-यांना प्रोत्साहन ही मिळाले पाहिजे. विकास काम आणि आपल्या कर्मचा-यांच्या कल्याण योजना यांचा समतोल राखावा लागेल. कर्मचारी

# शिंदेच्या मर्जीतील बांगर यांच्या हाती ठाणे मनपाची सूत्रे, राज्यातील IAS अधिका-यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्यातील ४४ आयएएस अधिका-यांच्या गुरुवारी बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये जिल्हाधिकारी ते महापालिका आयुक्तांसह अनेक वरिष्ठ अधिका-यांचा समावेश आहे. ठाण्यातील महापालिका आयुक्त विपीन शर्मा यांची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यकारी अधिकारी पदी बदली झाली आहे. तर त्यांच्या जागी आता अभिजीत बांगर यांची नियुक्ती करण्यात आलीय. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मर्जीतले अधिकारी अशी अभिजीत बांगर यांची ओळख आहे. मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी संजय नार्वेकर यांची वर्णी लागली आहे. ते शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांचे व्याही आहेत. अभिजीत बांगर यांच्याकडे ठाण्याच्या आयुक्तपदाची सूत्रे देण्यात आली असून आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला असल्याचं म्हटलं जात आहे.



बदली करण्यात आलेल्या अधिका-यांमध्ये वल्सा नायर-सिंह यांची गृहनिर्माण, मनीषा म्हैसकर (मुख्य राजशिष्टाचार अधिकारीपदाबरोबरच मराठी भाषा विभागाचा अतिरिक्त कार्यभार), प्रदीप व्यास (आदिवासी विकास), प्रवीण दराडे (पर्यावरण), हर्षदिप कांबळे (उद्योग), मिलिंद म्हैसकर (उत्पादन शुल्क व नागरी उड्डयण), संजय खंदारे (आरोग्य), अश्विनी जोशी (वैद्यकीय शिक्षण), सौरभ विजय (पर्यटन) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ठाण्याच्या जिल्हाधिकारीपदी अशोक शिनगारे यांची बदली झाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या व्यवसाथापकीय संचालकपदी विपीन शर्मा, महानिर्मिती कंपनीची व्यवस्थापकीय संचालकपदावर पी अनबलगन यांची नियुक्ती केली आहे.

# भाज्यांचे दर कडाडले; सामान्यांचं बजट गडबडलं

## कोथिंबिरीचे भाव गगनाला...

**मुंबई,** पावसाचा जोर कमी झाला असला तरी भाजीपाला दर मात्र चढेच आहेत. अशातच सर्वच भाज्यांत वापरल्या जाणा-या कोथिंबीर जुडीने उच्चांक गाठला आहे. भाजीपाल्याचे दर गगनाला भिडल्याचं चित्र आहे. कोथिंबिरीचा दर गगनाला भिडला असून कोथिंबीर जुडी थेट 200 रुपयांना विकली जात आहे. नाशिक जिल्ह्यात पावसाचा जोर कमी झाला असला तरी भाजीपाला दर मात्र चढेच आहेत.

अशातच सर्वच भाज्यांत वापरल्या जाणा-या कोथिंबीर जुडीने उच्चांक गाठला आहे. ऐन सणाच्या काळात कोथिंबिरीचा भाव वाढला आहे. आवक कमी झाल्याने नाशिकमध्ये सध्या कोथिंबिरीला चांगला भाव मिळत आहे. जवळपास 160 रुपये जुडी एवढा भाव व्यापा-यांकडून शेतक-याला मिळत असून बाजारात 200 रुपयांनी कोथिंबीर जुडीची विक्री होत आहे. त्यामुळे शेतक-यांना चांगला फायदा होत असून सर्वसामान्यांनी मात्र तोंडात



बोटे घातली आहेत. नाशिक शहरासह पावसाने उघडीप दिली असली तरी अनेक भागात पावसाने भाजीपाल्याची अवस्था खराब केली आहे. यामुळे अद्यापही शेतमालाची आवक देखील बाधित झाली आहे. नियमित होत असेल्या आवकेच्या तुलनेत अवघी 50 ते 60 टक्के आवक सध्या सुरू असल्याने भाजीपाल्याचे दर कडाडलेलेच आहेत. पालेभाज्या तर मिळेनाशा झाल्या आहेत.

ज्या थोड्याफार पालेभाज्या उपलब्ध होत आहेत. त्यांचे दरही जास्त असल्याचे चित्र आहे. शेतकरी बांधवांकडील भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दाखल होत असतो. तेथून विक्रेत्यांकडून भाजीपाला खरेदी करत किरकोळ बाजारात विक्री केली जाते. नियमित आवकेच्या सुमारे 50 ते 60 टक्केच आवक सध्या होत आहे. त्यामुळे कोणत्याही भाजीचे दर 20 किंवा 30 रुपये पावशेरपासून सुरु होऊन 120 ते 160 रुपये किलोपर्यंत जात आहेत.

दरम्यान बाजारात भेंडी, शिमला, गिलके, दोडके, बटाटे, वांगी अशा नेहमीच्या भाज्या आवाक्याबाहेर दिसत असल्याने मुलांच्या डब्यात काय द्यायचे असा प्रश्न गृहिणींना सतावत आहे.

# आता आमच्यात नातं उरलेलं नाही; धनंजय मुंडे यांनी बेधडक सांगून टाकलं!

**मुंबई,** राजकीय विरोधामुळे आमच्यातील नाते आता संपले आहे, अशी जाहीर कबुली राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी दिली असून यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. धनंजय मुंडे यांच्या या व्यक्तव्याला पंकजा मुंडे यांनी देखील उत्तर दिले आहे.

राजकरणात रक्ताचे नाते देखील दुरावले जाते याचा प्रत्यय राज्यात आला आहे. राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे आणि भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांचे नाते दुरावल्याची कबुली खुद्द धनंजय मुंडे यांनी दिली आहे. आमच्यात आता बहीण-भावाचे नाते उरले नाही असे मुंडे यांनी म्हटले असून त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना उत आला आहे. त्यांच्या या वक्तव्यावर पंकजा मुंडे या देखील व्यक्त झाल्या असून त्यांनी देखील सूचक विधान केले आहे.



धनंजय मुंडे यांनी त्यांच्यातील आणि पंकजा मुंडे यांच्यातील नात्याविषयी भाष्य केले होते. मुंडे म्हणाले होते की, आता आमच्यात बहीण-भावाचं नात हे उरलेले नाही. राजकारणामुळे आता आम्ही एकमेकांचे वैरी आहोत. आम्ही पूर्वी ख-या अथार्नें एकमेकांचे नातेवाईक होतो. पण राजकरणामुळे आमच्यात वैर निर्माण झाले आहे. त्यामुळे आम्ही आता दुरावलो असून अश्या वागण्यामुळे काय परिणाम होतो याचे ज्याचे त्याने आत्मपरीक्षण करावे असे धनंजय मुंडे म्हणाले.

भगवान गडाच्या दस-याची परंपरा ही संतश्रेष्ठ भगवानबाबांनी सुरू केली. स्व.गोपीनाथ मुंडे असेपर्यंत ही परंपरा सुरू होती. आता कुणी मेळाव्याला जायचं कुणाला बोलवायचं. दसरा मेळाव्याला केंद्रीय मंत्र्याला आमंत्रण का दिले नाही ते त्यांनाच विचारा. आम्ही भाऊ-बहीण म्हणून राजकीय विरोधक आहोत. आपण ज्या पक्षात आहोत त्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांबद्दल काय बोलावं हे ज्याने त्याने ठरवावं. मी त्याबाबत सांगण्यासाठी मी लहान आहे असे देखील धनंजय मुंडे यांनी म्हटले होते.

धनंजय मुंडे यांच्या या व्यक्तव्यावर पंकजा मुंडे म्हणाल्या, ह्लगोपीनाथ मुंडे यांनीच रक्ताचे नाते कधी संपत नाही असे सांगितले होते. मी वैर बाळगत नाही. माझ्यासाठी कोणीही राजकीय शत्रू नाही. मी व्यक्तीच्या विचारांशी राजकारणाची तुलना करत असून मला कुणी वैरी वाटत नाही, असे मुंडे म्हणाल्या.

# आईने मोबाइल दिला नाही म्हणून 14 वर्षांच्या मुलाची आत्महत्या

**पुणे,** जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील क-हावागज येथे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आईने मोबाइल दिला नाही म्हणून १४ वर्षांच्या मुलाने आत्महत्या केली आहे. गुरुवारी रात्री घरातच पत्र्याच्या शेडला तिने साडीच्या साह्याने गळफास घेऊं आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण तालुका हादरून गेला आहे.



शुभम मोतीराम धोत्रे (वय १४) असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे. शुभम हासोमेश्वर विद्यालय अंजनगाव येथे इयत्ता ९ वी मध्ये शिक्षत होता.त्याच्या आत्महतेप्रकरणी राजेंद्र अशोक लष्कर (वय २७), रा. क-हावागज, लष्करवस्ती (ता. बारामती, जि. पुणे) यांनी माळेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या महितीनुसार शुभमला मोबाईलचे वेड होते. मोबाइलसाठी तो आईनेकडे नेहमी हट्ट धरायचा. त्याला नवीन मोबाइल द्यावा यासाठी तो आईला नेमही मागणी करत होता. मात्र, घरची परिस्थितीती बेताची असल्याने आई त्याला मोबाइल घेऊं देऊ शकत नव्हती. यातून शुभमला नैराश्य आल्याने त्याने गुरुवारी रात्री, गळफास घेऊन आत्महत्या केली.

लहान मुलांना आज मोठ्या प्रमाणात मोबाईलचे व्यसन लागले आहे. यामुळे मुले ही वाममागार्ला लागतांना देखील दिसत आहे. यामुळे पालकांनी मुलांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

## ललीता पंचमी निमित्त तुळजापूरच्या भवानी मंदिरात मुरली अलंकार पूजा

**तुळजापूर** ललीता पंचमी निमित्त तुळजापूरच्या भवानी मंदिरात मुरली अलंकार पूजा मांडण्यात आली आहे. भगवान श्रीकृष्णांनी जगदंबा मातेस



आपली मुरली, बासरी दिली त्या प्रसंगाची आठवण म्हणून आज मुरली अलंकार पूजा मांडण्यात आली आहे. ह पूजा पाहण्यासाठी दर्शनासाठी मोठी रांग लागली आहे. आजपासून तुळजापूरात पाचव्या खेट्याला गर्दी वाढणार आहे. सध्या नवरात्रोत्सव सुरू असून शुक्रवारी म्हणजे आज नवरात्राची पाचवी माळ आहे. पाचव्या माळेला पारंपरिक खेटा पूर्ण करण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. त्यानंतर शनिवार, रविवार सुट्ट्या आहेत. यामुळे शुक्रवारपासून सलग 3 दिवस भाविकांच्या गर्दीत वाढ होण्याची शक्यता आहे.

## चंद्रपूर शहरात 60 वर्ष जुनी 3 मजली इमारत कोसळली, 1 व्यक्ती ढिगा-याखाली दबल्याची भीती

**चंद्रपूर,** शहरात 60 वर्ष जुनी 3 मजली इमारत कोसळली, 1 व्यक्ती



दबल्याची भीती, घुटकाळा वाडार्तील राज मंगल कार्यालय परिसरात ही इमारत आहे. पुंडलिक पाटील आणि त्यांचे कुटुंब या इमारतीत वास्तव्याला होते. इमारत अचानक हलू लागल्याने कुटुंबातील व्यक्ती बाहेर आल्या. मात्र एक जण आतच अडकून राहिल्याने दबला गेल्याची भीती, घटनास्थळी चंद्रपूर महानगरपालिकेचे पथक व पोलिसांनी पोहोचून मदत कायार्ला सुरुवात केली आहे. जुनी व मोडकळीस आलेली ही इमारत असल्याने मनपाने दिला होता रिकामी करण्याचा इशारा

# पनवेलच्या आयटीआय, बीएड कॉलेजची विदारक अवस्था दाखवल्यानंतर मनसे, युवासेना आक्रमक

**पनवेल,** आयटीआय आणि सरकारी डीएड कॉलेजची ही स्थिती पाहिल्यानंतर सामान्य लोकांसह राजकीय पक्षांकडून संताप व्यक्त केला जात आहे. ही विदारक अवस्था दाखवल्यानंतर युवासेना आणि मनसे देखील आक्रमक झाली आहे. या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी युवासेनेनं केली आहे तर तात्काळ हे चित्र बदला अन्यथा मनसे आपल्या पद्धतीने हा प्रश्न सोडवेल, असा इशारा मनसे प्रवक्ते गजानन काळे यांनी दिला आहे. दूरावस्थेत असलेल्या धोकादायक पनवेल आयटीआय कॉलेजचा महिन्यात चेहरामोहरा बदलणार असल्याचं कालच मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितलं आहे.पनवेलमधील ITI आणि बीएड महाविद्यालयाच्या धोकादायक इमारतीत जीव मुठीत घेऊन हजारपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पनवेलमधील आयटीआय कॉलेजची अवस्था एखाद्या भूत बंगल्यासारखी झाली असल्याचं भीषण चित्र आहे. विशेष म्हणजे 2014 साली ही इमारत धोकादायक ठरवूनही त्याच ठिकाणी वर्ग भरवले जातात. म्हणजेच जवळपास आठ वर्ष हजारो विद्यार्थ्यांनी जीवमुठीत घेऊन शिक्षण घेतलं.



आता राजकीय पक्ष आक्रमक झाले आहेत. युवासेनेचे वरुण सरदेसाई यांनी म्हटलं आहे की, या वसतीगृहाच्या प्रश्नासंदर्भात युवासेना शिष्टमंडळ उच्चतंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेणार आहे. विद्यार्थी कशाप्रकारे राहताहेत कशाप्रकारे शिक्षण घेतात याचं वास्तव महाराष्ट्रासमोर एबीपी माझाने दाखवलं. महाराष्ट्रातल्या कानाकोप-यात तुम्ही कुठेही गेलात शासकीय वस्तीगृह दयनीय अवस्थेत आहे. विद्यार्थी संघटनेने आंदोलन करायची आणि सरकारने आश्वासन द्यायची मात्र काहीच होत नाही. याची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे, असं सरदेसाई यांनी म्हटलं आहे. राजकारण सुरूच राहील मात्र विद्यार्थ्यांच्या भवितव्याकडे सरकारने लक्ष दिलं पाहिजे. सरकारने स्वतः ऑडिट करून एक धोरण ठरवून यावर तातडीने काम करण्याची गरज आहे, कोरडी आश्वासन देऊ नयेत, असं देखील ते म्हणाले. मनसे प्रवक्ते गजानन काळे यांनी म्हटलं आहे की, राज्यातील सर्व आयटीआयची पाहणी करून समिती नेमून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना सोयीसुविधा द्याव्यात. एकीकडे अमृत महोत्सव आपण साजरा करतोय तर दुसरीकडे अशाप्रकारे आपल्या राज्यात वसतीगृहांची दुर्दशा झाली आहे. साध्या सोयीसुविधा विद्यार्थ्यांना या ठिकाणी देऊ शकत नाही हे दुर्दैव आहे. मी मुख्यमंत्री आणि त्यासोबतच कौशल्य विकास मंत्री यांना विनंती करतो की फक्त पनवेलचं हे आयटीआय कॉलेज, हॉस्टेल नाही तर महाराष्ट्रातील इतर आयटीआय कॉलेजमध्ये सुद्धा ही स्थिती आहे. त्यामुळे या संदर्भात समिती नेमून या गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात ही मागणी करतो. आपण लक्ष घालून तात्काळ हे चित्र बदला. अन्यथा मनसे आपल्या पद्धतीने हा प्रश्न सोडवेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## औरंगाबादहून अंबाजोगाईकडे कोळवाडीजवळ येताना भीषण अपघात, एकाचा मृत्यू

**औरंगाबाद,** अंबाजोगाई येथील रहिवासी असलेले जितेंद्र झंवर हे आपल्या कुटुंबीयांसह औरंगाबादहून अंबाजोगाईकडे येत असताना कोळवाडीजवळ त्यांची गाडी आली असता त्यांच्या कारने एका ट्रकला पाठीमागून जोराची धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की यामध्ये ज्योती झंवर यांचा जागीच मृत्यू झाला. तर जितेंद्र झंवर आणि त्यांची मुलगी रजत झंवर हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत

## दसरा मेळाव्यासाठी लोक मनाने आलेले असावेत, कारवाईच्या भीतीने आलेले नसावेत, निलम गो-होंचा शिंदे गटाला टोला

दसरा मेळाव्यासाठी आलेले लोक मनाने आलेले असावेत. सीबीआय, ईडी, तडीपारी, चौकशी या कारवाईच्या भीतीने आलेले नसावेत असे वक्तव्य विधान परिषदेच्या उप सभापती नीलम गो-हे यांनी केलं. शेवटी बाजार बुणगे आणि शिवसैनिक यात फरक आहे. दसरा मेळाव्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडे मदत मागितली असा जावई शोध कोणी लावला? राम कदम यांच्याकडे काही असा पुरावा आहे का ? असा प्रश्न गोरे यांनी उपस्थित केला आहे.

## माळेगाव सहकारी साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा वादळी ठरण्याची शक्यता

विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या ताब्यातील असणारा माळेगाव सहकारी साखर कारखान्याची आज 67 वी वार्षिक सर्वसाधारण सभा होणार आहे. ही वार्षिक सर्वसाधारण सभा वादळी ठरण्याची शक्यता आहे. या सभेमध्ये सोमेश्वर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील दहा गावे माळेगाव कारखान्यामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.



# पोलीस अर्लट मोडवर, स्थानिक पोलिसांसाठी ‘हे’ महत्त्वाचे निर्देश जारी

**मुंबई,** दहशतवाद्यांना मदत, देशविरोधी कारवायांच्या आरोपातंर्गत केंद्र सरकारने पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेवर बंदी घातल्यानंतर राज्यातील पोलीस



प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. राज्य पोलीस प्रशासनाने जिल्हा पोलिसांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. पीएफआय आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या हालचालींवर नजर ठेवण्याची सूचना देण्यात आली आहे.

महाराष्ट्र पोलिसांन सर्व जिल्हा पोलीस आणि आयुक्तालयांना विशेष मार्गदर्शक तत्व जारी केले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व स्थानिक पोलिसांना पीएफआयशी निगडित प्रत्येक सदस्यांच्या हालचालींवर नजर ठेवण्यास सांगितले आहे. पीएफआयचे कार्यकर्ते, सदस्य या बंदीच्या विरोधात कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे कार्यकर्ते कोणत्या नवीन संघटनेच्या बॅनरखाली कार्यक्रमाचे आयोजन करतात, याकडे नजर ठेवण्याची सूचना पोलिसांना देण्यात आली आहे. पीएफआय व इतर संबंधित संघटनांवर बंदी घातल्याने काहीजणांकडून सहानुभूती व्यक्त केली जात आहे. पीएफआयबद्दल सहानुभूती ठेवणा-या आणि त्यांच्या पाठिंब्याबाबत सोशल मीडियावर पोस्ट लिहिणा-या अकाउंटवर पोलिसांच्या टीमची नजर असणार आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पीएफआयबद्दल सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. या माध्यमातून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सोशल मीडिया अकाउंट, वेबसाइट्स, सोशल मीडिया पेजेस यावर देखरेख ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पीएफआयवर बंदी घालण्यात आल्यानंतर काही ठिकाणी त्यांच्या कार्यालयावरीह फलक हटवण्यात आले आहेत. त्यानंतर आता पीएफआयचा झेंडा, बॅनर, पोस्टर, होर्डिंगचा वापर केल्यास संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे आदेश महाराष्ट्र पोलिसांनी स्थानिक पोलिसांना दिले आहेत. पीएफआयवर बंदी घातल्यानंतर त्यांच्यांशी संबधित देशभरातील 34 बँक खाती गोठवण्यात आली आहेत. यामुळे पीएफआयशी संबंधितांना आता या खात्यांतून रक्कम काढता येणार नाही. पीएफआयचे आर्थिक व्यवहार संशयास्पद असल्याचे तपास यंत्रणांनी म्हटले आहे. पीएफआय आणि त्याच्याशी संलग्न संस्थांच्या खात्यांमध्ये गेल्या काही वर्षांत 120 कोटी रुपये जमा करण्यात आल्याची माहिती ईडीने न्यायालयात दिली होती.

# दिग्दर्शकाच्या नावाने बोगस फेसबुक अकाउंटवरून तरुणींशी चॅटिंग करणा-या इंजिनिअरला अटक

**मुंबई,** सध्या सायबर क्राईमचे प्रमाण वाढत आहे. सोशल मीडियावर खोटे अकाऊंट ओपन करुन काही लोक फसवणुक करत आहेत. प्रसिद्ध दिग्दर्शकाच्या नावाने फेसबुकवर बोगस अकाउंट ओपन करुन मुलींची चॅटिंग करणा-या इंजिनियरला वसोर्वा पोलिसांनी अटक केली आहे.आरोपी शनामुगावडीवेल थणगावेल (31) हा इंजिनिअर आहे. तो तामिळनाडू येथील रहिवासी असून वसोर्वा पोलिसांनी त्याला तामिळनाडू येथून अटक केली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने एका प्रसिद्ध दिग्दर्शकाच्या नावाने फेसबुकवर बोगस अकाउंट ओपन केले होते. यावरून तो सिनेमात काम करण्यास इच्छुक असलेल्या तरुणींना काम देण्याचे कबूल करून त्यांच्याकडून बायोडाटा मागवून तरुणीशी संवाद साधून त्यांच्याकडून त्यांचे बोल्ड फोटो मागवून त्यांना ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करत होता. ही बाब काही तरुणींनी दिग्दर्शक श्रीराम राघवन सुंदरा राघवन यांच्या निदर्शनास आणून दिली यानंतर राघवन यांनी यासंदर्भात वसोर्वा पोलीस स्टेशन येथे 23 मार्च रोजी तक्रार नोंदवली.

घटनेचे गांभीर्य पाहून वसोर्वा पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी पथक तयार करण्यात आले. यानंतर तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता आरोपी हा परराज्यातील असल्याचे निष्पन्न झाले यानंतर वसोर्वा पोलिसांच्या एक पथकाने त्रीचोनगोड तामिळनाडू येथून आरोपीस ताब्यात घेतले आरोपीला न्यायायलायात हजर करण्यात आल्यानंतर आता आरोपीला पोलीस कस्टडी मिळाली आहे. या इंजिनिअरने मुंबईमध्ये किती मुलींना अशा पद्धतीने फसवला आहे? या संदर्भात वसोर्वा पोलीस या अधिक तपास करत आहे.

# बनावट प्रमानपत्र देणा-या डॉक्टर टोळीतील एकाला बेड्या, म्होरके मात्र अद्यापही फरारच

नाशिक : पोलीस दलासह आरोग्य क्षेत्रात खळबळ उडवून देणा-या गुन्ह्यातील डॉ. स्वप्नील सैंदाणे याला नाशिक पोलीसांनी अखेर बेड्या ठोकल्या आहेत. आज नाशिकच्या जिल्हा न्यायालयात त्याला हजर करण्यात आले होते त्यात न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. डॉ. स्वप्नील सैंदाणे याला नाशिकच्या ग्रामीण पोलीसांच्या पथकाने नंदुरबार मधील अक्कलकुवा येथून अटक केली होती. याशिवाय त्याच्या एका साथीदाराला देखील अटक केली आहे. आंतरजिल्हा बदलीकरिता लागणारे वैद्यकीय प्रमाणपत्र हे बनावट स्वरूपात बनवून देत होते. डॉ. सैंदाणे याने सर्जन पदवी नसतांना एमडी सर्जन असल्याचे सांगत पोलिस कर्मचा-यांच्या वैद्यकीय अहवालावर शिक्के आणि सही दिली होती.



संपूर्ण राज्यात चर्चिले जात असलेले बनावट प्रमाणपत्र प्रकरण नाशिक पोलीसांनी चांगलेच मनावर घेतले आहे. नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधिक्षक सचिन पाटील यांनी या बनावट प्रमाणपत्र रॅकेटचा पदार्फाश केला आहे. आत्तापर्यंत जवळपास 29 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून यामध्ये वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस कर्मचा-यांचा समावेश आहे. नाशिकच्या तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात आत्तापर्यंत नाशिक ग्रामीण मुख्यालयातील वरिष्ठ लिपिकासह जिल्हा रुग्णालयातील लिफ्टमनला अटक करण्यात आली आहे. याशियाय सातपूर परिसरात असलेल्या प्रभावती रुग्णालयाचे डॉ. स्वप्नील सैंदाणे, जिल्हा रुग्णालयाच्या रेकॉर्ड रुमचे लिपिक किशोर पगारे, सिडकोतील सहजीवन रुग्णालयाचे डॉ. वीरेंद्र यादव यांचा समावेश आहे. हे सर्व गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होते. त्यात डॉ. स्वप्नील सैंदाणे हे पोलीसांच्या हाती लागले असून त्यांचा एक साथीदार देखील पोलीसांच्या हाती लागला आहे. याशिवाय या प्रकरणातील नाशिक जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेले तत्कालीन अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. श्रीनिवास आणि डॉ. निखिल सैंदाणे यांच्या नावाचा समावेश झाला आहे. त्यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज देखील दाखल केला होता, मात्र जिल्हा न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला असून त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

पोलीस बातमी पत्र
ALL SCAN & PAY
ACCEPTED HERE
PhonePe
G Pay
Pay

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898